# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 16.02.2026** **वार- सोमवार**

---

**कॅथलॅब**

पुण्यातील औंध जिल्हा रुग्णालयात नवीन अत्याधुनिक ‘कॅथलॅब’ उभारणीला मंजुरी मिळाली असून, याxcxc20साठी १०० कोटी रुपयांच्या विशेष निधीची तरतूद करण्यात आली आहे. यामुळे पुण्यात हृदयविकारावरील उपचारांसाठी, महत्त्वाची सोय उपलब्ध होणार आहे. राज्यात पुण्यासह जालना, गडचिरोली आणि कोल्हापूर या चार जिल्ह्यांमध्ये हृदय तपासणी आणि उपचार कक्ष म्हणजे कार्डियाक कॅथलॅब उभारणीस सार्वजनिक आरोग्य विभागाने मंजुरी दिली आहे. पुण्यात ही ‘कॅथलॅब’ औंध जिल्हा रुग्णालयात कार्यान्वित होईल. हा प्रकल्प हृदयविकार असलेल्या रुग्णांसाठी दिलासादायक ठरणार आहे. आतापर्यंत हृदयविकाराच्या गंभीर रुग्णांना अँजिओग्राफी, अँजिओप्लास्टी सारख्या तपासण्या आणि उपचारांसाठी खासगी रुग्णालयात जावं लागत होतं. त्यामुळे रुग्णांच्या उपचारात विलंब होण्याबरोबरच आर्थिक भार आणि मानसिक तणावही वाढत होता. ही बाब लक्षात घेऊन जिल्हा रुग्णालयांमध्ये ‘कार्डियाक कॅथलॅब’ उभारण्याचा निर्णय आरोग्य विभागाने घेतला आहे.

**स्वच्छांजली**

छत्रपती शिवाजी महाराजांनी दिलेला कल्याणकारी राज्याचा वारसा आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला देशसेवेचा संस्कार जपत, पुण्यातील औंध-बोपोडी प्रभागात 'महापुरुषांना स्वच्छांजली' या अभिनव मोहिमेचा आज उत्साहात प्रारंभ करण्यात आला. प्रभाग क्रमांक आठचे

नगरसेवक सनी निम्हण यांच्या पुढाकाराने ही मोहीम शिवजयंती ते भीमजयंती म्हणजे १९ फेब्रुवारी ते १४ एप्रिल या काळात राबवण्यात येणार आहे. महापुरुषांच्या जयंतीनिमित्त केवळ अभिवादनच नाही, तर त्यांच्या विचारांतून कृतीशील स्वच्छता अभियान राबवण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. या मोहिमेच्या उद्घाटन प्रसंगी पुण्याचे उपमहापौर परशुराम वाडेकर, प्रशासकीय अधिकारी आणि मान्यवरांची उपस्थिती होती.

**<u>शिवजयंती</u>**

स्वराज्यातील शंभराहून अधिक सरदार घराण्याच्या रथांच्या साक्षीने यंदाची शिवजयंती अवघ्या विश्वाला हेवा वाटेल, अशा स्वरूपात साजरी करणार आहोत, असा निर्धार शिवजयंती महोत्सव समितीचे संस्थापक अध्यक्ष अमित गायकवाड यांनी व्यक्त केला. अमित गायकवाड यांना नुकताच इजिप्तमध्ये एका सोहळ्यात 'ग्लोबल एक्सलन्स पुरस्कार' प्रदान करण्यात आला. या निमित्ताने विविध सरदार घराण्यांच्या वतीने गायकवाड यांचा नुकताच पुण्यात सत्कार करण्यात आला; त्यावेळी ते बोलत होते. अमित गायकवाड यांच्या संकल्पनेतून गेली १४ वर्षे, स्वराज्यातील विविध घराण्यांच्या रथांच्या सहभागातून शिवजयंती उत्सव साजरा केला जात आहे. हा सोहळा लाल महाल परिसरातून सुरू होतो.

**<u>छात्रसंसद</u>**

एमआयटी विश्वशांती विद्यापीठ आणि एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंटच्या वतीनं येत्या २१ ते २३ फेब्रुवारी या कालावधीत १५वी 'भारतीय छात्र संसद' होणार आहे. कुलगुरू डॉ. आर. एम. चिटणीस यांनी आज पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. उद्घाटन समारंभाला वरिष्ठ पत्रकार राजदीप सरदेसाई आणि मध्य प्रदेशाचे माजी मुख्यमंत्री दिग्विजय सिंह प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. तीन दिवस चालणाऱ्या संसदेमध्ये राजकीय, सामाजिक, प्रसारमाध्यमे, अभिनय आणि उद्योग क्षेत्रातील अनेक मान्यवर संबोधित करणार आहेत.

**गुरुजीपुरस्कार**

समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात होणारे परिवर्तनाचे यशस्वी प्रयोग केवळ व्यक्तीपुरते मर्यादित न राहता समाजव्यापी होण्याची गरज आहे, असं प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सह-सरकार्यवाह अतुल लिमये यांनी शनिवारी पुण्यात केलं. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनकल्याण समितीतर्फे आयोजित 'पूजनीय श्रीगुरुजी पुरस्कार' प्रदान सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी प्रसिद्ध उद्योगपती डॉ. अभय फिरोदिया मुख्य पाहुणे म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमात संशोधन क्षेत्रासाठीचा पुरस्कार दादा लाड यांना, तर समाजप्रबोधन क्षेत्रासाठीचा पुरस्कार आचार्य श्री महंत भारत भूषणदासजी महाराज यांना प्रदान करण्यात आला. शाल, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह आणि एक लाख रुपये असं या पुरस्काराचं स्वरूप होतं.

**पीएमआरडीए**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या म्हणजे पीएमआरडीए हद्दीत आता विकास आराखड्याऐवजी स्ट्रक्चर प्लॅन तयार करण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबतचे आदेश नगर विकास विभागाने जारी केले आहेत. त्यानुसार आता प्राधिकरणाच्या हद्दीत रस्त्यांचे जाळे आणि पायाभूत सुविधा उभारण्याचा आराखडा तयार करण्यात येणार आहे. या स्ट्रक्चर प्लॅनचे प्रारूप जाहीर करण्यासाठी शासनाने प्राधिकरणाला सहा महिन्यांची मुदत दिली आहे.

**एफआरपी**

राज्यातील शेतकऱ्यांना उसाच्या एफआरपीच्या 60 टक्क्यांपेक्षा कमी रक्कम देणाऱ्या 45 साखर कारखान्यांना साखर आयुक्त डॉ. संजय कोलते यांनी नोटिसा बजावल्या आहेत. त्याबाबतची सुनावणी आयुक्तालयात उद्या आणि परवा होणार आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान ३३ आणि किमान तापमान १४ पूर्णांक ९ दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्याही तापमान साधारण असंच असेल, असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार!**